लोकमत

मस्ट READ

# ‘मन की बात’मध्ये पैठणच्या पैठणीचा गौरव

## कविता ढवळे यांच्या मेहनतीची मोदींकडून दखल

दादासाहेब गलांडे
लोकमत न्यूज नेटवर्क

**पैठण :** पैठणची शान असलेली ‘पैठणी’ पुन्हा एकदा राष्ट्रीय चर्चेत आली आहे. आपल्या मेहनतीने आणि कौशल्याने पैठणी विणकामाच्या परंपरेला नवा आयाम देणाऱ्या कविता अरुण ढवळे या विणकर महिलेल्या कार्याची दखल खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी ‘मन की बात’ कार्यक्रमात घेतली. ढवळे यांच्या संघर्षमय प्रवासाचे कौतुक करत, त्यांनी हा आदर्श अनेकांसाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले.

पैठण हे शहर केवळ ऐतिहासिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर विणकामाच्या पारंपरिक कलेसाठीही ओळखले जाते. शालिवाहन राजवटीपासून ते निजामाच्या काळापर्यंत हे शहर वस्त्र व्यापाराचे केंद्र होते. आजही पैठणी विणकामाचा वारसा येथे जपला जात असून, शासनाच्या मऱ्हाटी पैठणी केंद्रात ६० महिला, तर घरगुती स्तरावर ३०० हून अधिक महिला पैठणी विणकामात गुंतल्या आहेत. त्यातून अनेक महिलांना रोजगाराची संधी मिळत आहे. याच मऱ्हाटी पैठणी केंद्रात शहरातील जैनपुरा भागातील कविता ढवळे या गेल्या २३ वर्षांपासून कार्यरत आहेत. त्यांनी १२ वीपर्यंतचे शिक्षण घेतले असून, आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही हार न मानता दिवस मऱ्हाटी केंद्रात आणि संध्याकाळी घरी विणकाम सुरू त्यांनी ठेवले.

(‘संमिश्र’वर)



पैठण येथे पैठणी साडीचे घरी हातमागावर विणकाम करताना कविता ढवळे.

## पैठणी स्त्री शक्तीचे प्रतीक

पंतप्रधानांकडून मिळालेला गौरव हा केवळ कविता ढवळे यांचाच नव्हे, तर पैठणमधील प्रत्येक मेहनती विणकर महिलेच्या उत्कृष्ट कामाची पावती आहे. त्यांच्या कार्यामुळे पैठण आणि पैठणीचे नाव पुन्हा राष्ट्रीय स्तरावर चर्चेत आले आहे. पैठणी ही केवळ साडी नसून, ती परंपरा, संस्कृती, स्त्रीशक्तीचे प्रतिक आहे. कविता ढवळे त्या परंपरेच्या आधुनिक प्रतिनिधी ठरल्या आहेत.

> पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माझ्या कार्याची दखल घेतल्याने भारावून गेले आहे. पैठणी जगात कुठेही मशीनवर बनू शकत नाही, ती फक्त हातमागावरच शक्य आहे. जर पैठणमध्ये क्लस्टर निर्माण झाले, तर महिलांना रोजगार मिळेल, सर्व साहित्य एकाच ठिकाणी मिळेल, व्यवसाय अधिक गतिमान होईल.
>
> **कविता ढवळे,** विणकर, पैठण

छत्रपती संभाजीनगर । पुणे । मुंबई । कोल्हापूर । सांगली । नाशिक । सोलापूर । नागपूर । सातारा । जळगाव । नांदेड । अकोला । अहिल्यानगर येथून दररोज प्रसिद्ध

SakalNews SakalMediaNews esakal.com TOLL FREE: 9881 598 815

# सकाळ

छत्रपती संभाजीनगर • छत्रपती संभाजीनगर, सोमवार, २८ जुलै २०२५ • आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ७०९९५/९९ किंमत ₹ ५ • आजचा अंक : (एकूण पाने : १८ : १० + ८ (टुडे)

शिवालये आज गजबजणार!

पान : ३



भारत-इंग्लंड चौथा कसोटी अनिर्णित

पान : ७




# पैठणी विणत्या हातांचा पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून गौरव!



नरेंद्र मोदी




**पैठण (जि. छत्रपती संभाजीनगर), ता. २७ (बातमीदार) :** शासनाच्या येथील 'मऱ्हाटी पैठणी साडी केंद्रा'तील विणकर कविता ढवळे यांचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (ता. २७) 'मन की बात' या कार्यक्रमात सन्मानपूर्वक उल्लेख केला. कविता या केवळ कपडे, पैठणी बनवत नाहीत, तर त्यांची स्वतःची ओळख निर्माण करत आहेत, अशी भावना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केली. महावस्त्र पैठणी साडी व या कलेचे त्यांनी भरभरून कौतुक केले.

## पैठणच्या कविता ढवळेंच्या कार्याचा 'मन की बात'मध्ये सन्मानपूर्वक उल्लेख

राष्ट्रीय हातमाग दिनानिमित्त गेल्या वर्षी (७ ऑगस्ट २०२४) पैठणी विणकर कविता ढवळे यांना दिल्ली येथे निमंत्रित करण्यात आले होते. तत्कालीन उपराष्ट्रपती जगदीप धनखड, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंग यांनी उत्कृष्ट विणकर म्हणून कविता यांचा सन्मान केला होता. त्यानंतर आता 'मन की बात' या कार्यक्रमात खुद्द पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या कार्याची दखल घेतली.

यापूर्वीच्या 'मन की बात'मध्ये मोदी यांनी पाटोदा (ता.जि. छत्रपती संभाजीनगर) या गावात राबविलेल्या पर्यावरणपूरक व अन्य सामाजिक उपक्रमांचा उल्लेख केला होता.

शासनाच्या 'मऱ्हाटी पैठणी साडी केंद्रा'त कविता ढवळे यांनी एक वर्ष प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी याच केंद्रात परिपूर्ण पैठणी साडी निर्मितीचे काम सुरू केले. केंद्र सरकारच्या वस्त्रोद्योग विभागाच्या विणकर सेवा केंद्राने त्यांना १ लाख २० हजारांचे अनुदान दिले. या अनुदानातून कविता यांनी घरी हातमागावर पैठणीचे काम करण्यासाठी शेड उभारले. आता घरी बनविलेल्या पैठणीतूनही त्यांना उत्पन्न मिळत आहे.

### काय म्हणाले पंतप्रधान मोदी?

- 'खादीने स्वातंत्र्य लढ्यात बळ दिले. आता वस्त्रोद्योग क्षेत्र देशाच्या विकासातही बळ देत आहे. लाखो लोक त्यात सामील होऊन यशाची एक नवी गाथा लिहीत आहेत', असे सांगून पंतप्रधान मोदी यांनी महाराष्ट्रातील पैठणच्या कविता ढवळे यांचा उल्लेख केला. ज्या पैठणी साड्या बनवत आणि विकत आहेत, या महिला केवळ कपडे बनवत नाहीत तर त्या स्वतःची ओळख निर्माण करत आहेत, अशी भावना पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली.

> 'मऱ्हाटी पैठणी केंद्रा'त मिळालेल्या प्रशिक्षणामुळे मी हे काम शिकले. प्रशिक्षणानंतर धनलक्ष्मी महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा रेखा कुलकर्णी यांनी हातमाग घेण्यासाठी दहा हजारांचे कर्जरूपी अर्थसाह्य केले. त्यामुळे सुरवातीला मोठा आर्थिक आधार मिळाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मध्ये माझा केलेला गौरवपूर्ण उल्लेख अविस्मरणीय असाच आहे.
> **– कविता ढवळे,**
> विणकर, पैठण



**पैठण :** हातमागावर पैठणीचे विणकाम करताना कविता ढवळे.